# मुंबई विद्यापीठ

मानव संसाधन विकास कक्ष
कक्ष क्र. २११, एम्.जी.रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ०३२

वेब साईट : www.mu.ac.in
ई-मेल : dr.estab@fort.mu.ac.in

दूरध्वनी : ०२२-६८३२००९३/९४


---

क्र.मासंविक/आयसीसी/२०२३-२४/ ११७१ दि. १६ जानेवारी, २०२४

## परिपत्रक

विषय:- लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार मुंबई विद्यापीठातील शासनमान्य पदांवरील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्कांच्या अंमलबजावणीबाबत सुधारीत तरतूदींचा शासन निर्णय लागू करणे.....

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, समन्वयक/संचालक, सिंधुदुर्ग, रत्नागिरी उप परिसर, समन्वयक/संचालक, ठाणे व कल्याण उपकेंद्र, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालय लवाद न्यायाधिकरण, मानद विधी सल्लागार, विधी कक्ष सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व स्थायी शिक्षकेतर अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की:-

**उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त अकृशि विद्यापीठे, अशासकीय अनुदानित महाविद्यालये, अनुदानित संस्था इत्यादी मधील सफाई कर्मचाऱ्यांना लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नियुक्ती मिळणेबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्रमांक सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ अन्वये लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार शासकीय सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती मिळण्यासाठी यापुर्वी वेळोवेळी निर्गमित झालेले सर्व शासन निर्णय/परिपत्रके अधिक्रमित करण्यात आली आहेत.**

या परिपत्रकाव्दारे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील शासन मान्य सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्तीचे धोरण लागू करण्याच्या अनुषंगाने विदित करण्यात येते की, लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार मुंबई विद्यापीठातील शासनमान्य पदांवरील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्तीबाबत सर्व शासन निर्णय/परिपत्रके अधिक्रमित करण्यात येऊन नविन शासन निर्णय क्रमांक सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ नुसार शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहे. सदर बाब सर्व संबंधित कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त कर्मचारी/अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

तसेच विद्यापीठाच्या सर्व अधिकारी/विभाग प्रमुख/समन्वयक/प्राचार्य/संचालक यांना सूचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त विभाग/कक्ष/उपकेंद्र/परिसर/महाविद्यालयामध्ये शासन मान्य पदांवर कार्यरत असलेल्या सफाई कर्मचारी यांना लाड-पागे समितीच्या शिफारशींची माहिती देण्यात यावी व माहिती प्राप्त झाल्याबाबत त्यांच्याकडून लेखीस्वरूपात माहिती मिळाल्याबाबतचे पत्र व माहिती संकलित करून सदर माहितीचा दस्तऐवज उपकुलसचिव, मानव संसाधन विकास कक्ष, फोर्ट यांना लेखी दस्तऐवजांसह कळवावी. तसेच आपल्या कार्यालयातील सफाई कर्मचारी दिवंगत झाल्यास त्यांच्या वारसांना लेखीस्वरूपात कळविण्यात यावे व त्या पत्राची एक प्रत मानव संसाधन विकास कक्षास देण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्याचा संकेतांक क्र. २०२३०२२४१८३८५६०७२२ असा आहे.

Balirameh 18.01.2024

(प्रा. बळीराम गायकवाड)
**प्रभारी कुलसचिव**

.....२/-

क्र.मासंविक/आयसीसी/२०२३-२४/११७१ दि. १६ जानेवारी, २०२४

**(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१) विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे उप परिसर व संचालक, कल्याण उपकेंद्राचे समन्वयक/संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालय लवाद न्यायाधिकरण, मानद विधी सल्लागार, विधी कक्ष सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.

२) स्वीय सहायक : १) कुलगुरु २) प्र-कुलगुरु ३) कुलसचिव ४) अधिष्ठाता ५) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१) सचिव, उमासा. मुंबई विद्यापीठ

२) सचिव, मुंबई विद्यापीठ ऑफिसर्स वेल्फेअर असोशिएशन

३) सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ

४) सरचिटणीस, एज्युकेशनल एम्प्लॉईज वेल्फेअर असोशिएशन

५) सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना

Baliram 18.01.2024

(प्रा. बळीराम गायकवाड)
**प्रभारी कुलसचिव**